भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CH 026665

NOTARY
NOTED & REGISTERED
at Serial No. 568/2024
DATE 3/2/2024
THIS DOCUMENT CONTAINS
1+4 Total Pages 5

TREASURY OFFICE NASIK
26 FEB 2024
STPHC ATO

NOTARY
ADV. HARSHAL S. KENGE
NASHIK DISTRICT MAHARASHTRA
GOVT. OF INDIA
FIVE RUPEES NOTARIAL

# साठेखत करारनामा

साठेखत करारनामा आज दिनांक २ माहे मार्च इसवी सन २०२४ रोज शनिवार ते दिवशी नाशिक मुक्कामी . . . .

S.S. Aher

प्लॉट नंबर- २७/२८, यांसी एकुण क्षेत्र ५००.०० चौ.मी., यांसी आकार रु.७५०.००पैसे, यांसी सिटी सर्व्हे नंबर- ६१४८ व ६१४७, यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे -

## जोडपत्र -२

दस्ताचा प्रकार/ अनुच्छेद क्र. : बँक

दस्त नोंदणी करणार आहेत का होय/नाही

असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव:

मिळकतीचे वर्णन :

मोबदला रक्कम : मुद्रांक शुल्क रक्कम :

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता SBI

हस्ते असल्यास नाव व पत्ता :

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक व दिनांक :

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

परवाना क्र. ८७/१९५/२६ नाशिक

( ज्या कारणासाठी मुद्रांक खरेदी केला त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्याच्या आत वापरणे बंधनकारक आहे)

NOTARY
ADV. HARSHAL S. KENGE
NASHIK DISTRICT
MAHARASHTRA
REG. No. 14522
Valid up to 18/09/2024
GOVT. OF INDIA

| | |
|---|---|
| **१) श्री. सचिन माधव आहेर**<br>उ.व.- ३८, धंदा - नोकरी,<br>पॅनकार्ड नं.-ए आर बी पी ए ३१४६ एम<br>आधारकार्ड नं.-५४४७ ४००८ १४१८<br>**२) सौ. सारिका सचिन आहेर**<br>उ.व.- ३१, धंदा - गृहीणी,<br>पॅनकार्ड नं.-बी आर व्ही पी ए २२०७ सी<br>आधारकार्ड नं.-७८२३ ३३१९ ७५०५<br>दोघे रा.- सोमा टोल नाक्याजवळ,मु.पो.<br>मंगरुळ,चांदवड,जि.नाशिक -४२३१०१. | **लिहून घेणार** |

**- : यांसी : -**

| | |
|---|---|
| **१) श्री. प्रदीप सुकदेव हिरे**<br>उ.व.- ४१, धंदा - नोकरी,<br>पॅनकार्ड नं.-ए बी एस पी एच ४३९४ आर<br>आधारकार्ड नं.-४४८७ ९८४७ ६१६६<br>**२) सौ. सोनाली प्रदीप हिरे**<br>उ.व.- ३९, धंदा - गृहीणी,<br>पॅनकार्ड नं.-ए टी बी पी एच ६२१९ जी<br>आधारकार्ड नं.-९३२९ २०३२ ८९०७<br>दोघे रा.- फ्लॅट नं.१०२,जेमीनी हाईट्स-१,<br>एक्सप्रेस इन हॉटेलच्या बाजुला,गोकुळ नंदन<br>कॉलनी,पाथर्डी फाटा,नाशिक -४२२०१०. | **लिहून देणार** |

**कारणे साठेखत करारनामा लिहून देतात तो ऐसा जे की : -**

या साठेखत करारनाम्यांत संक्षिप्ततेसाठी लिहून घेणार यांचा उल्लेख **तुम्ही** व लिहून देणार यांचा उल्लेख **आम्ही/आमचे** व या दस्ताचा विषय असलेल्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख **सदर मिळकत** असा केलेला असून सदरचे संज्ञांमध्ये उभयतांचे वालीवारस, असाईनी, प्रतिनिधी, मुखत्यार, सक्सेसर इत्यादींचा समावेश आहे व राहील.

**१) मिळकतीचे वर्णन : -**

**अ) प्लॉट मिळकतीचे वर्णन : -**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, **मौजे पाथर्डी-२** येथील **सर्व्हे नंबर-२९५/४/२७/२८** पैकी मंजूर ले आऊटमधील बिनशेती **प्लॉट नंबर-२७/२८**, यांसी एकुण क्षेत्र ५००.०० चौ.मी., यांसी आकार रु.७५०.००पैसे, यांसी **सिटी सर्व्हे नंबर-६१४८ व ६१४७**, यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे -

NOTARY ADV. HARSHA S. KENGE NASHIK DISTRICT MAHARASHTRA REG. No. 14522 Valid up to 18/0?/2024 GOVT. OF INDIA



| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | लागू सर्व्हे नंबर-३१५ची मिळकत |
| पश्चिमेस | : | ९.०० मीटर रुंदीचा कॉलनी रोड |
| दक्षिणेस | : | प्लॉट नंबर-२९ |
| उत्तरेस | : | प्लॉट नंबर-२६ |

येणेप्रमाणे चतु:सिमांकीत प्लॉट मिळकती, जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह, तदंगभुत वस्तुसह तसेच सदर मिळकतीमध्ये जाणेयेण्याचे, वागवहीवाटीचे हक्कांसहच्या प्लॉट मिळकती दरोबस्त.

**ब) <u>या दस्ताचा विषय असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन</u> : -**

कलम१-अ या प्लॉट मिळकतीवर बांधकाम केलेल्या **''जेमीनी हाईटस-१ अपार्टमेंटस''** या इमारतीतील <u>स्टिल्ट मजल्यावरील **फ्लॅट नंबर-२(दोन)**, यांसी कार्पेट क्षेत्र ७०४.४५चौ. फुट म्हणजेच ६५.४७ चौ.मी.</u>, यामध्ये हॉल, किचन, दोन बेडरुम, संडास, बाथरुम, बाल्कनी इत्यादी व सदर इमारतीचे घोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त फ्लॅट मिळकतीस सदर अपार्टमेंटमध्ये ७.६०% इतका मालकीहक्क व मतदानाचा हक्क असलेली फ्लॅट मिळकत, यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे : -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | जीना व पॅसेज |
| पश्चिमेस | : | इमारतीची मोकळी जागा |
| दक्षिणेस | : | इमारतीची मोकळी जागा |
| उत्तरेस | : | फ्लॅट नंबर-३ |

येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक फ्लॅट मिळकत, त्यात जाण्यायेण्याचे, वागवहिवाटीचे व सामाईक सुविधा, मार्जीनल स्पेस, पार्कीग, कॉमन टेरेस वापर करण्याचे हक्कासहची फ्लॅट मिळकत दरोबस्त.

२) वर कलम १ब यांत वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही लिहून देणार यांचे मालकीची असून त्यांचे कब्जे, वहीवाटीतील व उपभोगातील आहे. सदर फ्लॅट मिळकत ही लिहून देणार यांनी जैसन जोसेफ यांचेकडून दिनांक ३/०६/२०२० रोजी ''करारनामा'' या दस्तान्वये घेतलेली आहे. सदरचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग२, नाशिक-१ यांचे कार्यालयात दस्त क्र.-२७०७/२०२० अन्वये नोंदविण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त इमारतीचे बिल्डर, डेव्हलपर यांनी उपरोक्त ''जेमीनी हाईट्स-१ अपार्टमेंटस'' या इमारतीबाबत महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टचे तरतुदीप्रमाणे ''डिक्लेरेशन ऑफ अपार्टमेंट'' चा दस्त दि.११/०६/२०१८ रोजी लिहून दिलेला आहे. सदरचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग२, नाशिक-१ यांचे कार्यालयात दस्त क्र.-४८४०/२०१८ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच जैसन जोसेफ यांनी लिहून देणार यांचे लाभात दिनांक २८/०८/२०२० रोजी ''डीड ऑफ अपार्टमेंट'' चा दस्त लिहून दिलेला आहे. सदरचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग २, नाशिक-१ यांचे कार्यालयात दस्त क्र.-४६५२/२०२० अन्वये नोंदणीकृत केलेला आहे. सदरचे दस्तान्वये उपरोक्त प्लॉट मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला कब्जेदार सदरी फ्लॅट धारकांची नांवे नोंद क्र.-२९४४३ अन्वये लागलेली आहेत. सदरचे दस्तांपासून उपरोक्त फ्लॅट मिळकत ही आमचे म्हणजे लिहून देणार यांचेच कब्जे, उपभोगात व वहिवाटीत आहे. आमचे शिवाय सदर मिळकतीचे इतर कोणीही मालक नाही. आमचे स्वामीत्वात कुठेही दोष नाही. सदर फ्लॅट मिळकतीचे आम्ही एकमेव मालक आहे. येणेप्रमाणे प्राप्त असलेल्या हक्क व अधिकारानुसार सदर फ्लॅट मिळकतीची पाहीजे तशी विक्री, व्यवस्था अगर विल्हेवाट लावणेचा आम्हांला पूर्ण हक्क व अधिकार आहे.

सदरचे प्राप्त हक्क व अधिकारात त्यांनी उपरोक्त फ्लॅट मिळकत विक्रीस काढली, ही गोष्ट लिहून घेणार यांना समजली तसेच लिहून घेणार यांनाही सदर मिळकत घ्यावयाची होती,म्हणून उभयतांमध्ये मिळकतीचे किंमतीविषयी बोलणी बैठका होऊन व्यवहार निश्चित करण्यात आला. सदरचे व्यवहारा कामी उभयतांमध्ये अटी व शर्ती ठरल्या, सदरच्या अटी व शर्ती रेकॉर्ड करणेकामी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात सदरचा साठेखत करारनामा लिहून दिलेला आहे.

३) सदर फ्लॅट मिळकतीबाबत तुमचे व आमचे दरम्यान बोलणी होवून व्यवहाराच्या अटी व शर्ती ठरलेल्या आहेत, त्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : -

१. उपरोक्त कलम १ब यांत वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीची मोबदला रक्कम तुमचे व आमचे दरम्यान उक्ती रक्कम रु.२८,१२,०००/-(अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख बारा हजार मात्र) इतकी ठरली असून सदरची किंमत आजचे प्रचलित बाजार भावाने योग्य व बरोबर आहे.सदर किंमतीविषयी उभयतांची तक्रार नाही.

२. वर कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा कब्जा हा आजपासून २ (दोन) महीने या मुदतीत म्हणजेच सदर मिळकतीचे अंतिम हस्तांतरणाचे वेळी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दयावयाचा आहे. तसेच सदरचा कब्जा घेतेवेळी लिहून घेणार यांनी क्षेत्राची खात्री व मिळकतीची पाहणी करुन घ्यावयाची आहे. सदरची बाब उभयतांना मान्य व कबूल आहे.

३. सदरील मिळकतीचे मोबदल्याची संपुर्ण रक्कम मिळालेनंतर अंतिम हस्तांतरणाचा आवश्यक तो दस्तऐवज तुमचे नांवे सांगाल त्यावेळी आम्ही, लिहून देणार समक्ष हजर राहून लिहून व नोंदवून देऊ, त्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण करणार नाही अगर कोणत्याही प्रकारचा वेगळा मोबदला मागणार नाही.

४. प्रस्तुतच्या साठेखत करारनाम्यान्वये लिहून दिलेली मिळकत ही आम्ही तुम्हांस कायमस्वरुपी विक्री केलेली असून सदर मिळकत कोणत्याही कारणाने उलट खरेदीने अथवा करारनाम्याने परत दयावयाची नाही.

५. प्रस्तुतचे करारानुसार आम्ही,लिहून देणार असे जाहीर करतो की,वर वर्णन केलेल्या मिळकतीवर लिहून देणार यांनी यापुर्वी भारतीय स्टेट बँक या बँकेकडून कर्ज घेतलेले आहे.सदरचे कर्जाव्यतिरिक्त उपरोक्त फ्लॅट मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. सदर मिळकत आम्ही अगर आमचे कुटुंबघटक तसेच आमचे तर्फे हक्क सांगणारे वालीवारस व हितचिंतक यांनी कोठेही गहाण, दान,लिन, लिज, अन्नवस्त्र, अगर जप्ती, जामिनकी, तोंडी वा लेखी बोलीने विक्री केलेली नाही, तसेच कररमदार, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, मृत्युपत्रान्वये हस्तांतर केलेली नाही. मिळकतीं बाबत कुठल्याही कोर्टात वाद लवाद चालू नाही. सदर मिळकत अॅक्वायर अगर रिक्वीझीशन झालेली नसून त्याबाबत आम्हाला निमसरकारी अगर स्थानिक सरकार कडून नोटीस लागलेली नाही व सदर मिळकतीतून कोणासही जाणेयेण्याचा, पाणी नेणे आणण्याचा इजमेंटचा हक्क नाही. अशा प्रकारे मिळकत निर्वेध आहे हे खात्रीने सांगून भरवशाने लिहून देत आहे. सदर मिळकतींबाबत अंतिम हस्तांतरणापावेतो कोणताही वाद, कर्ज, बोजा, हरकती निर्माण झाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करुन देऊ,त्याची तोषिस तुम्हांस लागू देणार नाही.

NOTARY ADV. HARSHAL S. KENGE NASHIK DISTRICT MAHARASHTRA REG. No. 14522 Valid up to 18/09/2024 GOVT. OF INDIA

६. वर कलम १ब यांत वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीवर भारतीय स्टेट बँक यांचा कर्जाचा बोजा असून सदरचे कर्जाची मुद्दल व व्याज या संपुर्ण रक्कमेची वर नमूद केलेल्या मुदतीत पदरखर्चाने परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांनी अंगिकारलेली आहे. तसेच लिहून देणार यांनी उपरोक्त संस्थेचे संपुर्ण कर्ज भरलेनंतर त्याचा ना हरकत दाखला व मिळकतीचे मूळ दस्तऐवजांची फाईल बँकेकडून घेणे व इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करणे इत्यादी कामे पदरखर्चाने करुन दयावयाची आहेत.तसेच मजकूर मिळकतीचे अंतिम हस्तांतर करणेकामी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या व इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता लिहून देणार यांनी त्यांचे पदरखर्चाने करुन दयावयाची आहे,तसेच व्यवहारातील इतर कायदेशीर व तांत्रिक अडचणींचे निवारण करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांनी अंगिकारलेली आहे.तसेच लिहून घेणार यांनी मोबदल्याची संपुर्ण रक्कम दिलेनंतर ते मिळकतीचे अंतिम हस्तांतरण करुन घेतील तेव्हा लिहून देणार यांनी आवश्यक त्या ठिकाणी वेळोवेळी हजर राहून सहया संमत्या करुन दयावयाच्या आहेत.

७. वर कलम १ब यांत वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत लिहून घेणार यांना टायटलची तपासणी करावयाची असल्यास त्यांनी वकीलामार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द करावी. सदरचे नोटीसीस कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्याचे निवारण पदरखर्चाने करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांनी अंगिकारलेली आहे.

८. वर कलम १ब यांत नमूद केलेल्या मिळकतीसंबंधाने आम्ही अन्य कोणाही बरोबर करारमदार केलेला नाही अगर सदर मिळकत कुठल्याही जड जोखमीत गुंतविलेली नाही, अशा प्रकारे मिळकत संपूर्णत: निर्वेध व बिनबोजाची असल्याची खात्री देऊन तुमचे लाभात सदर मिळकत लिहून देत आहे.

९. सदर मिळकतीसंबंधाने जे जे हक्क व अधिकार आम्हाला प्राप्त झालेले होते.ते ते सर्व हक्क व अधिकार तुम्हांस कायमस्वरुपी अंतिम हस्तांतरणाचे आवश्यक त्या दस्तऐवजाने बहाल करण्यात येतील, याची जाण लिहून देणार यांस आहे.

१०. मजकूर मिळकतीचे कामी जे जे कर/टॅक्सेस भरावयाचे आहे ते सर्व कर आम्ही, लिहून देणार यांनी अंतिम हस्तांतरणापावेतो भरुन दयावयाचे आहेत. तसेच तेथून पुढे आकारुन येणारे कर / टॅक्सेस तुम्ही, लिहून घेणार यांनी मालक या नात्याने भरावयाचे आहेत, याची जाण उभयतांना आहे.तसेच सदर मिळकतीची संपुर्ण मोबदला रक्कम लिहून देणार यांना दिलेनंतर मिळकतीचे अंतिम हस्तांतरणाचा दस्त करणेचा आहे.तसेच लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचे शासकीय, निमशासकीय कार्यालयात सदर मिळकत त्यांचे नावाने हस्तांतरीत करुन घ्यावयाची आहे. त्याकामी आवश्यक ते संपुर्ण सहकार्य लिहून घेणार यांनी करणेचे आहेत.

११. भरण्याचा तपशिल : सदर मिळकतीची उभयतांमध्ये मोबदला म्हणून उक्ती किंमत रक्कम रुपये २८,१२,०००/-(अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख बारा हजार मात्र)अशी ठरली असुन सदरची मोबदला रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कशी दयावयाची, त्याचा भरणा तपशिल खालीलप्रमाणे :-

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| रु.२,८२,०००/- | अक्षरी रुपये दोन लाख ब्यांशी हजार मात्र इतकी रक्कम दिनांक २/०३/२०२४ रोजीचा चेक नंबर-६८२९५८, भारतीय स्टेट बँक, चांदवड |

शाखा, जि.नाशिक अन्वये लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिली ती मिळाली, सदरचे भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही.

रु.२५,३०,०००/- अक्षरी रुपये पंचवीस लाख तीस हजार मात्र इतकी रक्कम आजपासून २(दोन) महीने या मुदतीत लिहून घेणार यांनी कोणत्याही बँक अथवा वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन अगर स्वत:चे जबाबदारीवर सदर रकमेतून लिहुन देणार यांचे भारतीय स्टेट बँकेचे कर्ज परतफेड करावयाचे असुन उर्वरीत रक्कम लिहून देणार यांना दयावयाची आहे व सदरचा व्यवहार पुर्ण करणेचा आहे.

---

रु.२८,१२,०००/- एकूण अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख बारा हजार मात्र

---

येणेप्रमाणे वर भरण्याचे तपशिलात नमूद केल्याप्रमाणे मोबदला रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दयावयाची आहे. सदरचे दस्तात मुदत हा महत्वाची अट आहे.

१२. उपरोक्त मिळकतीचे अंतिम हस्तांतरण होईपावेतो, लिहुन देणार हे सदर मिळकतींतील त्यांचे हक्क, हितसंबंध भागश: किंवा संपुर्ण तया कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करणार नाही किंवा अन्य कोणासही तबदिल करणार नाही व लिहुन घेणार यांना प्रस्तुतचे करारान्वये प्राप्त झालेले हक्कांस, अधिकारास बाधा येईल, असे कोणतेही कृत्य आम्ही अगर आमचे तर्फे हक्क सांगणारे वालीवारस करणार नाही व मिळकतीवर बोजा उत्पन्न करणार नाही, हे खात्रीने सांगून भरवशाने लिहून देत आहे.

१३. मजकुर मिळकतीचे अंतिम हस्तांतरणाकामी येणारा खर्च जसे स्टॅम्प, नोंदणी, लिहिणावळ, नोंदणावळ, टायपिंग, झेरॉक्स इत्यादीचा संपुर्ण खर्च लिहुन घेणार यांनी करणेचा आहे, त्याचेशी लिहुन देणार यांचा काहीएक संबंध नाही.

१४. वर कलम १ब यांत वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचे अंतिम हस्तांतरण करण्याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार व लिहून देणार यांची आहे.तसेच लिहून घेणार यांनी ठरलेल्या मुदतीत मोबदल्याची संपुर्ण रक्कम दयावयाची आहे व सदरची मोबदल्याची संपुर्ण रक्कम मिळालेनंतर लिहून देणार यांनी कोणत्याही प्रकारची अडचण न करता सदर मिळकतीचे अंतिम हस्तांतरणाचा दस्त लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवून देणेचा आहे.सदरची बाब उभयतांनी मान्य व कबूल केलेली आहे.

१५. प्रस्तुतचा साठेखत करारनाम्यातील अटी व शर्ती आमचेवर,आमचे पश्चात आमचे वालीवारसांवर व आमचे तर्फे हक्क सांगणारे इसमांवर बंधनकारक आहे व राहील. तसेच या करारनाम्यातील अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी उभयतांवर आहे, याची जाण उभयतांना आहे.

येणेप्रमाणे हा साठेखत करारनामा आज रोजी आम्ही, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात राजीखुशीने व स्वसंतोषाने, कोणाचेही धाक, दबाव व प्रभाव यांस बळी न पडता, कोणत्याही प्रकारे नशा पाणी न करता, उत्तम मनस्थितीत लिहून, विचारपुर्वक वाचून व समजावून घेऊन तसेच सदर दस्त बरोबर असल्याचे मान्य व कबूल करुन दोन साक्षीदारांसमक्ष आमच्या सहया करुन लिहून दिला असे.

NOTARY ADV. HARSHAL S. KENGE NASHIK DISTRICT MAHARASHTRA REG No. 14522 Valid up to 18/09/2024 GOVT. OF INDIA

हा साठेखत करारनामा.

नाशिक :

दिनांक : २/०३/२०२४



१) श्री. प्रदीप सुकदेव हिरे



२) सौ. सोनाली प्रदीप हिरे

(लिहून देणार)



१) श्री. सचिन सुभाष आहेर



२) सौ. सारिका सचिन आहेर

S.S. Aher

(लिहून घेणार)

साक्षीदार : -

१) ________ नामकिरण रमेश गुलाटी

२) ________ रत्नाकर नंदु जगताप

Adv. Manoj Chavan

**BEFORE ME**

**HARSHAL S. KENGE**
**Advocate & Notary Govt. & India**
GD 09 & 10, Back Side of Godavari Tea Stall,
Thakkar Bazzar, Nashik

Parties are
Identified by :-

भारत सरकार
GOVT. OF INDIA



22012010

---

भारत सरकार
Government of India



Aadhaar no. issued: 05/08/2012

सचिन माधव आहेर
Sachin Madhav Aher
जन्म तारीख/DOB: 10/10/1986
पुरुष/ MALE

आधार हा ओळखीचा पुरावा आहे, नागरिकत्व किंवा जन्मतारखेचा नाही
Aadhaar is proof of identity, not of citizenship or date of birth. It should be used with verification (online authentication, or scanning of QR code / offline XML).

5447 4008 1418
माझे आधार, माझी ओळख

NOTARY

---

भारत सरकार
GOVT. OF INDIA

AHER
RAM DESHMANE



---

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA



सारिका सचिन आहेर
Sarika Sachin Aher
जन्म तारीख/ DOB: 12/06/1992
महिला / FEMALE

S.S. Aher

7823 3319 7505
माझे आधार, माझी ओळख

---

भारत सरकार
GOVT. OF INDIA

HIRAY
DEOBAHURAO HIRYA
1982
Account Number
...4394R



---

भारत सरकार
Government of India

आधार

Issue Date: 02/09/2014



प्रदीप सुकदेव हिरे
PRADIP SUKADEO HIRAY
जन्म तारीख/DOB: 01/06/1982
पुरुष/ MALE

4487 9847 6166
VID : 9127 4969 6921 2708
माझे आधार, माझी ओळख

---

आयकर विभाग
INCOME TAX DEPARTMENT

भारत सरकार
GOVT. OF INDIA

स्थायी लेखा संख्या कार्ड
Permanent Account Number Card

ATBPH6219G

नाम / Name
SONALI PRADIP HIRAY

पिता का नाम / Father's Name
KAREBHARI SHRAVAN NIKAM

जन्म की तारीख / Date of Birth
12/04/1984

हस्ताक्षर/ Signature



23062017

---

भारत सरकार
Government of India

Download Date: 22/01/2021

Issue Date: 15/01/2021



सोनाली प्रदीप हिरे
Sonali Pradip Hiray
जन्म तारीख/DOB: 12/04/1984
महिला/ FEMALE

9329 2032 8907
VID : 9123 0301 1090 7624
माझे , माझी ओळख

e-सुविधा
कार्यादेश क्र. 11/2023
BISG-0019

Receipt No. 014
A - पास

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## Nashik Municipal Corporation

### Property Tax Receipt

20[illegible]

Ref No. : eTu37506Mz2f
Receipt No. : CFCRECP000202[illegible]
Application No. : CPT568580
Owner/Occupier Name: : HIRE PRADIP SUKHDEV & HIRE SONALI PRADIP
House No.: : 423/295/JEMINI/F02
Paid By: : Self
Tax Receipt No : NMCRCP323959

Date : 30/11/2023
Center : Pathardi
Payment Mode : cash
Mobile No: : 9678763439
Address: : JEMINI HEIGHTS PATHARDI SHIWAR NEW NASHIK
Index No: : 42312240

| मागील शिल्लक | चालू शिल्लक मागणी | सूट रु | सोलार सूट | [illegible] रक्कम | [illegible] रु |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 1757 | 0 | 0 | 0 | 1757 |

एकूण भरना रक्कम: 1757 बाकी रक्कम : 0
(One Thousand Seven Hundred And Fifty-seven Only)

Collected By :pathcfc_ws1

नाशिक स्मार्ट सिटी

Note

1. This is computer generated receipt. Signature is not necessary.
2. This is valid to Nashik Municipal Corporation transaction only.
3. If cheque is not cleared or returned due to any reason this receipt will be cancelled automatically.

सही आणि शिक्का

नाशिक महानगरपालिका [illegible] विभाग २०२३-२०२४

महाराष्ट्र शासन

# गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- पाथर्डी - २ (९४४२३२) तालुका :- नाशिक जिल्हा :- नाशिक

PU-ID : 26182859199 भुमापन क्रमांक व उपविभाग २९५/४/२७/२८/प्लॉट/२७/२८ 26182859199

भुधारणा पद्धती **भोगवटादार वर्ग -१** शेताचे स्थानीक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार क्र | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक आर.चौ.मी | ४८२१ | [ ~~विकास जेमिनी -~~ | ~~५.००.००~~ | ~~७५०.००~~ | ] | (२९४४३) | कुळाचे नाव व खंड |
| अकृषिक क्षेत्र | १२१८७ | **जेमिनी हाईटस १ अपार्टमेंटस** | | | | (२९४४३) | इतर अधिकार |
| बिन शेती ५.००.०० | | **विकास जेमिनी -** | | | | (२९४४३) | इतर |
| | | ------सामाईक क्षेत्र------ | ५.००.०० | ७५०.०० | | | **बिनशेती (७३५५)** |
| बिन शेती आकारणी ७५०.०० | | | | | | | प्रलंबित फेरफार : **नाही.** |
| | | | | | | | शेवटचा फेरफार क्रमांक : २९८५५ व दिनांक : २६/१०/२०२१ |

जुने फेरफार क्र : **(७३५५) (७३७३) (१८१५७) (१८३३३) (१९५७९) (१९९३७) (२१५१४) (२५७३५) (२६२६६) (२८४६४) (२९८५५)**

सीमा आणि भुमापन चिन्हे :

**सदर सर्व्हे हा नगर भूमापन हद्दीत आहे.**

हा गाव नमूना क्रमांक ७ दिनांक २६/१०/२०२१:०३:४६:५३ PM रोजी डिजिटल स्वाक्षरीत केला आहे व गाव नमूना क्रमांक १२ चा डेटा स्वयंप्रमाणित असल्यामुळे ७/१२ अभिलेखावर वर कोणत्याही सही शिक्क्याची आवश्यकता नाही.

७/१२ डाउनलोड दि. : ०१/०३/२०२४ : १४:१५:४० PM. वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dslr/ या संकेत स्थळावर जाऊन 2011100001376391 हा क्रमांक वापरावा.



Digitally signed

# जमीन महसूलाची पावती

क्रमांक: RC/944232/2023-24/12187/1709618765

**(महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका-खंड चार- गा.न. क्र. ९ आणि ९-अ पहा).**

जेमिनी हाईटस 1 अपार्टमेंटस | विकास जेमिनी - ,
राहणार पाथर्डी - 2 तालुका नाशिक, जिल्हा नाशिक यांचे मार्फत सन 2023-24 या महसूल वर्षासाठी, खालीलप्रमाणे जमीन महसूलाची देय रक्कम प्राप्त झाली.

गाव: पाथर्डी - 2

खाते क्रमांक: 12187

भूमापन व उप-विभाग क्रमांक: 295/4/27/28/प्लॉट/27/28

**<u>प्राप्त रक्कम:</u>**

१) मागील थकबाकी: ₹ 0

२) नियत जमीन महसूल: ₹ 0

३) वाढीव जमीन महसूल: ₹ 0

४) अकृषीक कर: ₹ 750

५) जि.प. उपकर: ₹ 0

६) ग्रा.प. उपकर: ₹ 0

७) शिक्षण उपकर: ₹ 0

८) वाढीव शिक्षण उपकर: ₹ 0

९) रो.ह. उपकर: ₹ 0

१०) संकीर्ण जमीन महसूल (स्था.क. सह): ₹ 0

१०-अ) संकीर्ण जमीन महसूल (स्था.क. शिवाय): ₹ 0

११) नोटिसीचा खर्च: ₹

एकूण प्राप्त रक्कम: ₹ 750
(अक्षरी) ₹ सातशे पन्नास रुपये

ठिकाण: पाथर्डी - 2
दिनांक: 05-03-2024

कार्यालयाचा शिक्का

सही/-
तलाठी : मयुर अन्साराम आगरकर
साझा - पाथर्डी
तालुका :नाशिक जिल्हा :नाशिक

**देय पद्धत:** रोख